**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धीपत्रक**

## ❖ गणेशोत्सव 2025 पूर्वी रस्ते दुरुस्ती कामे पूर्ण करण्याबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्तांची सक्त सूचना

दिनांक 21 ऑगस्ट 2025 रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली रस्ते दुरुस्तीकरणाबाबत महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीला शहर अभियंता दिपक खांबित, कार्यकारी अभियंता नितीन मुकणे, उपअभियंते, कनिष्ठ अभियंते तसेच कंत्राटदार उपस्थित होते.

बैठकीदरम्यान मा. आयुक्तांनी शहरातील रस्त्यांची विद्यमान परिस्थिती, सुरू असलेली दुरुस्ती कामे आणि नागरिकांना होत असलेल्या अडचणींचा सखोल आढावा घेतला. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात मोठ्या प्रमाणावर नागरिकांची व वाहनांची हालचाल अपेक्षित असल्यामुळे, सर्व रस्ते दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. मा. आयुक्तांनी स्पष्ट निर्देश दिले की, गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वी म्हणजेच 27 ऑगस्ट 2025 पूर्वी शहरातील सर्व रस्ते पूर्णपणे दुरुस्त करून प्रवासयोग्य स्थितीत आणणे बंधनकारक आहे. यासाठी मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (MMRDA) तसेच सर्व कंत्राटदारांनी जबाबदारीने कामे पूर्ण करावीत, असे निर्देश देण्यात आले. तसेच, वेळेत कामे पूर्ण न केल्यास संबंधित कंत्राटदारांविरोधात कडक कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा देखील मा. आयुक्तांनी दिला. नागरिकांच्या सोयीसाठी आणि सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, हे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले. मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रशासन नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज शहर प्रदान करण्यासाठी प्रयत्नशील असून, गणेशोत्सव काळात नागरिकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना राबविण्याचे निर्देश मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी दिले.